**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail-** pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २४/०२/२०१८

## नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे संकल्पनेतुन ग्रामीण पोलीस दलातर्फे परिक्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगार तरूण/तरूणी तसेच पोलीस पाल्यांसाठी उद्या दिनांक २५/०२/२०१८ रोजी के.के.वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई आग्रा महामार्ग, नाशिक येथे ‘‘**भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन**’’ करण्यात आले आहे.

बेरोजगारांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस प्रशासनातर्फे रोजगार व कौशल्य विकास मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आहे. या मेळाव्याला उत्पादन, बॅंकिंग, रिटेल, प्रशिक्षक, टेलिकॉम, विमा, सेवा उद्योग, कृषीविषयक, नर्सिंग, ऑटोमोबाईल, औद्योगिक याचबरोबर सुरक्षाव्यवस्था, कामगार अशा विविध क्षेत्रातील कंपन्यांव्दारे सुशिक्षीत तरूण/तरूणींना नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. एस.एस.सी. / एच.एस.सी./ आय.टी.आय. /तांत्रिक पदवीकाधारक, पदवीधर उत्तीर्ण तरूण/तरूणी तसेच पोलीस पाल्यांसाठी या मेळाव्यात प्रत्यक्ष मुलाखती होणार आहे. सदर रोजगार मेळाव्याकरीता उपस्थित राहण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे परिक्षेत्रातील धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर तसेच नाशिक जिल्हयासह शहरातील सुशिक्षीत तरूण / तरूणी तसेच पोलीस पाल्यांसाठी गेल्या महिनाभरापासुन जॉबकार्डचे वाटप करण्यात आले असुन मेळाव्यास येतांना सदरचे जॉबकार्ड सोबत ठेवावे लागणार आहे. सदर मेळाव्यास सकाळी ०७:०० वा.पासुन सुरूवात होणार असुन नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे शुभहस्ते सकाळी ०९:३० वा. सदर मेळाव्याचे औपचारीक उद्घाटन होणार आहे. तसेच सदर मेळाव्यात गुणवत्ता, कौशल्य आणि प्रत्यक्ष मुलाखतीत पात्र झालेल्या तरूण/तरूणींना दुपारी ०१:०० वा. उपस्थित मान्यवरांचे हस्ते नियुक्ती पत्र देण्यात येणार आहे.

सदर मेळाव्यास नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक **मा.श्री. विनयकुमार चौबे सो**, नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त **मा.श्री.रविंद्रकुमार सिंगल सो.**, नाशिक जिल्हयाचे जिल्हाधिकारी **मा.श्री. बी.राधाकृष्णन सो.** यांचे प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यास पत्रकार बांधव / मिडीया प्रतिनिधी यांनी आवर्जुन उपस्थित रहावे, अशी विनंती नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आली आहे.